Impact Factor – 3.452 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

January-2018

SPECIAL ISSUE-XXVIII

# सामाजिकशास्त्रातील संशोधन

## सद्यस्थिती व दृष्टीकोन




अतिथी संपादक :

**डॉ. भाऊसाहेब गमे**

प्राचार्य,

महात्मा गांधी विद्यामंदिरचे कला व वाणिज्य महाविद्यालय,

येवला, जि. नाशिक (महाराष्ट्र)

मुख्य संपादक :

**डॉ. धनराज धनगर**

सहा. प्राध्यापक

महात्मा गांधी विद्यामंदिरचे कला व वाणिज्य महाविद्यालय,

येवला, जि. नाशिक (महाराष्ट्र)

This Journal is indexed in :

- UGC Approved Journal List No. 40705 & 44117
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- Universal Impact Factor (UIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

RESEARCH JOURNEY

SWATIDHAN PUBLICATIONS

# सामाजिकशास्त्रातील संशोधन : अर्थ व उद्दीष्ट्ये

डॉ. ए. डी. पवार (भूगोल विभाग)
डॉ. आर. के. जाधव (अर्थशास्त्र विभाग)
म.स.गा. महाविद्यालय, मालेगाव कॅम्प
ता. मालेगाव, जि. नाशिक

**प्रस्तावना (Introduction)**

ज्याप्रमाणे वैज्ञानिक पध्दतीने भौतिक वस्तुचे अध्ययन केले जाते. सामाजिक गोष्टींचे देखील वैज्ञानिक पध्दतीने अध्ययन केले जाते. म्हणुन केवळ भौतिक वस्तुंशी विज्ञान निगडीत नाही तर सामाजिक गोष्टीशीही विज्ञानाचा संबंध आहे. कोणत्या सामाजिक घटनेचे वैज्ञानिक दृष्टीकोनातुन अध्ययन करता येते. म्हणुनच सामाजिक विषयाचे अध्ययन करणाऱ्या विषयांना सुध्दा शास्त्र असे संबोधले जाते.

समाजशास्त्र अर्थशास्त्र राज्यशास्त्र, मानसशास्त्र इ. सर्व सामाजिक शास्त्रे आहेत. कारण या सर्व शास्त्रात समाजाच्या वेगवेगळ्या अंगाचे किंवा पैलुंचे अध्ययन केले जाते हे सर्व विषय समाजाशी संबंधित आहेत. या सर्व विषयांचे वैज्ञानकि पध्दतीने अध्ययन केले जाते म्हणून या सर्व विषयांना सामाजिक शास्त्री म्हटले जाते.

जे संशोधन सामाजिक घटनांबाबत केले जाते अशा संशोधनाला सामाजिक संशोधन म्हणतात. सामाजिक संशोधनात सामाजिक घटनांचा अभ्यास केला जातो. समाजाचा एक घटक म्हणून व्यक्तिच्या सामाजिक वर्तनाच्या त्यांच्या क्रिया-प्रतिक्रियांचे अभिवृत्तीचे विविध परिस्थितीच्या संदर्भात संशोधन केले जाते. त्याचप्रमाणे समुह, संस्था, समस्या, संस्कृती इत्यादी बाबत संशोधन केले जाते.

मानव विविध प्रकारचे वर्तन करीत असतो. या मानवी वर्तनामधील कार्यकारणसंबंधाचा शोध घेण्याचा प्रयत्न सामाजिक संशोधनात केला जातो. मानवी वर्तन हे अतिशय जटील असते या वर्तनात कुठे अनुक्रम नियम असतो काय ? हे लक्षात घेणे आवश्यक असते. वरवर बघता. मानवाच्या विविध वर्तनामध्ये परस्पर संबंध आढळून येत नाही परंतु मानवाच्या विविध क्रिया प्रतिक्रियाचे वैज्ञानिक दृष्टीकोणातुन अध्ययन केल्यास त्यांच्या क्रिया प्रतिक्रियांमध्ये कार्यकारण संबंध असल्याचे आढळून येतो मानवी क्रिया प्रतिक्रियातील कार्यकारण संबंध लक्षात घेऊन त्याआधारे सिध्दांत मांडण्याचा प्रयत्न केला जातो. म्हणून समाजशास्त्रज्ञ मानवी क्रियामधील कार्यकारण संबंधाचा शोध घेण्यासाठी संशोधन करतात.

**सामाजिक संशोधनाची व्याख्या : (Definition of Social Reserch)**

१. श्रीमती पॉलीन व्ही. यंग : सामाजिक संशोधन एक शास्त्रीय असुन जिचा उद्देश तार्कीक किंवा क्रमबध्द पध्दतीद्वारा नविन तथ्यांचा शोध घेणे किंवा जुन्या तथ्यांचे पुनर्परीक्षण आणि त्यांच्यात आढळून येणार अनुक्रम, अत:संबंधी कार्यकारण भाव आणि त्यांना संचलित करणाचा नैसर्गिक नियमांचे विश्लेषण करणे हा आहे.

(We may define social Research as a scientific undertaking which, by means of logical and systematized methods aims to discover new facts of old facts and to analyze their sequences interrelationships casual explanation and the Natural Laws Which govern them Pauline V. Young.)

ISSN : 2348-7143
January 2018

२. सी.ए.मोझर : सामाजिक घटना आणि समस्या याबाबत नविन ज्ञान प्राप्तीकरिता करण्यात आलेल्या व्यवस्थित संशोधनाला आपण सामाजिक संशोधन म्हणतात.

(Systematized investigation to gain new knowledge about social phenomena and problems. We call social Research. C. A. Moser.)

**सामाजिक संशोधनाचा अर्थ :** (Meaning of Social Research)

मानवी वर्तन घटनांच्या संदर्भात आजही संशोधन अपूर्णच आहे. म्हणून अशा वर्तन घटनांबाबत मानवाचे प्रयत्न निरंतर सुरु आहेत. सामाजिक समस्या सोडविण्याकरीता गृहीतकृत्याचे परीक्षण करणे नवीन घटनांचा शोध घेणे विशिष्ट घटनांमधील नवीन संबंध शोधण्या उद्देशाने कोणत्या तरी योग्य पध्दतीचा उपयोग करणे हा सामाजिक संशोधनाचा अर्थ आहे.

सामाजिक संशोधन हे शास्त्रीय नियमानुसार अशा मानवी क्रियांकडे संकेत करते की ज्याद्वारा सामाजिक जीवनाच्या संबंधात आपल्या ज्ञानाची वृध्दी होणे शक्य होते. तसेच अनेक घटना आणि त्यांच्या कारणाच्या संबंधात आपणास शास्त्रीय बोध होतो त्याच बरोबर त्या घटना व त्यांच्या कारणांमध्ये आढळुन येणाऱ्या पारस्पारीक संबंधाच्या संदर्भात नवीन माहिती प्राप्त होते. सामाजिक संशोधन हे ज्ञान प्राप्तीची अशी एक पध्दती आहे की, जी निरिक्षण, वर्गीकरण, प्रयोग आणि निष्कर्षाच्या सामान्य शास्त्रीय पध्दतीवर आधारीत असते आणि या पध्दतीद्वारे अज्ञात सामाजिक घटनांचा शोध घेतला जातो. त्याचप्रमाणे ज्ञान, सामाजिक घटनांचे विविचेन आणि विश्लेषण देखील केले जाते. अशा प्रकारे सामाजिक संशोधन ही सामाजिक जीवनाच्या संबंधामध्ये सत्याचा शोध घेणारी शास्त्रीय पध्दती आहे.

**सामाजिक संशोधनाची उद्दीष्टे :** (Objectives of Social Research)

सामजिक संशोधन करीत असतांना सामाजिक संशोधकांनी विविध उद्देश दोन विभागात केले आहेत.

१. सैध्दांतिक उद्दिष्ट्ये
२. उपयोगितावादी उद्दिष्ट्ये

सामाजिक संशोधनाच्या व्याख्यामध्ये प्रामुख्याने सैध्दांतिक उद्देशांवरच अधिक भर दिला असल्याचे आढळून येते. परंतु उपयोगिता हा देखील सामाजिक संशोधनाचे एक उद्दिष्ट्ये आहे.

**सैध्दांतिक उद्दिष्ट्ये :** (Theoretical Objectives)

**१. ज्ञानाची प्राप्तीकरणे : (To Gain Knowledge)**

सामाजिक संशोधना उद्देश हा सामाजिक जीवन, घटना, समस्या, संदर्भात ज्ञान प्राप्तकरणे आहे. केवळ तथ्यांच्या संदर्भातच नाही तर जुन्या तथ्याबाबत देखील ज्ञान मिळविले जाते अशा प्रकारे नवीन तथ्यांबाबत ज्ञान मिळविणे तसेच जुन्या तथ्यांचे पुनर्परिक्षण करुन सामाजिक घटनांच्या संदर्भातील आपले ज्ञान हे गतीशील आणि प्रगतीशील बनविणे हा संशोधनाचा एक अतिशय महत्त्वपुर्ण असा सैध्दांतक उद्देश आहे.

**२. सामाजिक घटनांधील प्रार्यात्मक संबंधाचा शोध घेणे :**

(To Investigate Functional Relationship in Social Pienomena)

विविध समाज शास्त्रज्ञांच्या मते कोणत्याही सामाजिक तथ्यांचे प्रकार्यविहीन अस्तित्व राहू शकत नाही. विविध सामाजिक घटना त्यांच्याद्वारे केल्या जाणाऱ्या प्रकार्याच्या आधारावरच प्रकार्यात्मक संबंध आढळून येतो. प्रकार्यात्मक संबंधामुळे सामाजिक जीवनात निरंतरता, गतीशिलता आणि व्यवस्थेची निर्मिती झाली आहे.

३. **स्वाभाविक नियमांचा शोध घेणे : (To Search Out Natural Laws)**

सामाजिक घटना या काही स्वाभाविक आणि सामाजिक नियमांच्या अंतर्गत येतात. त्या नियमांचा शास्त्रीय पध्दतीच्या आधारे शोध घेता येतो म्हणुन सामाजिक घटनांना नियंत्रीत करणाऱ्या नियमांचा शोध घेणे हा संशोधनाचा एक उद्देश आहे.

४. **शास्त्रीय संकल्पनाची निर्मिती : (To constuct Scientific Concept)**

श्रीमती पॉलींग यंग यांनी सामाजिक संशोधनाचा हा एक सेध्दांतिक उद्देश असल्याचे प्रतिपादन केले आहे. समाज शास्त्रात विविध प्रकारच्या शास्त्रीय संकल्पनाची निर्मीती करण्यात आली आहे. जेव्हा अनेक शास्त्रीय संकल्पना आणि पारी पारिभाषिक शब्द निर्माण केले जातील. तेव्हा सामाजिक शास्त्राला प्रगती करणे अधिक सुलभ होईल.

**व्यावहारिक किंवा उपयोगितावादी उद्दिष्ट्ये : (Applied Objectives)**

सामाजिक जीवन आणि विविध घटनांच्या संदर्भात आपणास सामाजिक संशोधनामुळे बरीच माहिती प्राप्त होते या दृष्टीने सामाजिक संबोधनाचे व्यावहारिक उद्दिष्ट्ये खालीलप्रमाणे -

१. **सामाजिक समस्या सोडविण्यासाठी : (To Solve the Social Problems)**

सामाजिक समस्या सोडविण्याच्या दृष्टीने सामाजिक संशोधनातून मिळविलेले ज्ञान अतिशय उपयुक्त आहे. प्राचीन काळात समाज जीवन हे सरळ आणि साधे होते. मानवाच्या गरजा या मर्यादित होत्या त्यामुळे त्या काळात सामाजिक समस्यांचे स्वरुप हे अधिक जटील नव्हते. परंतु आधुनिक काळात समाजजीवन हे अतिशय जटील आहे. विज्ञान आणि तांत्रिक प्रगतीमुळे आधुनिक समाज हा देखील दिवसेंदिवस जटील बनला आहे. त्याचबरोबर समाजजीवन आणि त्यासंबंधीचा समस्या या अतिशय जटील झाल्या आहेत. त्या संबंधात शास्त्रीय ज्ञान प्राप्त करणे आवश्यक आहे. सामाजिक संशोधनातून प्राप्त झालेल्या ज्ञानाच्या मदतीने समाजसुधारक नेते आणि प्रशासकीय अधिकारी यांना आधुनिक जटील समस्या सोडविणे शक्य झाले आहे.

२. **सामाजिक तणाव दुर करणे : (To Release Social Tensions)**

अनेकदा सामाजिक घटनांबाबत आपला चुकीचा समज असतो अशा गैरसमजुतीमुळे तणाव निर्माण होतो. उदा., भारतात जातीव्यवस्था आहे. जातीची उत्पत्ती ही ईश्वराने केली. त्यामुळे व्यक्तीने आपल्या जातीनुसार कार्य करावे मागील जन्मातील कर्मानुसार व्यक्तीचा जन्म श्रेष्ठ किंवा कनिष्ठ जातीत होतो. मागील जन्मी पाप केल्यामुळे या जन्मात कनिष्ठ जातीत जन्म झाला अशा गैरसमजुती जातीच्या संबंधात आढळून येतात. या गैरसमजुतीमुळे आपल्या देशात जाती संघर्ष आढळतो. परंतु जाती व्यवस्थेसंबंधीचे संशोधन करुन जाती बाबतचे गैरसमज दूर करणे शक्य आहे.

३. **सामाजिक योजना तयार करण्यासाठी** (To Make Social Planing)

सामाजिक योजना या समाजाला पुनर्जीवित करतात आणि त्याद्वारे महत्त्वपुर्ण अनूकूल परिवर्तन घडवून आणले जाते. कोणतीही सामाजिक योजना यशस्वी करण्यासाठी दोन गोष्टी महत्त्वाच्या आहेत. पहिली गोष्ट म्हणजे योजना हि किती प्रभावी आणि व्यवहारिक पध्दतीने बनलेली आहे आणि दुसरी गोष्ट म्हणजे ती योजना कार्यान्वित करण्यामध्ये लोकांचा कितपत सहयोग आहे.

सामाजिक संशोधनकर्त्यांचा सामाजिक संशोधनातून प्राप्त ज्ञानाला व्यवहारिक स्वरुप देण्याबाबत कोणताही संबंध नसतो संशोधनकर्ता स्वत: कोणत्याही व्यावहारिक कार्याकरिता सामाजिक समस्या सोडविण्यासाठी किंवा योजना बनविण्यासाठी संशोधनाचा उपयोग करीत नाही. हे समाजसुधारक नेते किंवा प्रशासकीय अधिकाऱ्यांने

असते. सामाजिक संशोधनाचा उद्देश हा केवळ ज्ञानाचा प्राप्ती करणे त्याचा विस्तार आणि पुनर्परीक्षण करणे हा असतो.

**४. सामाजिक नियंत्रणास सहाय्यक :** (To helpful in Social Control)

सामाजिक संशोधनातून प्राप्त केलेले ज्ञान सामाजिक नियंत्रण ठेवण्यास सहाय्यक ठरते. एखाद्या घटनेच्या संबंधात आपले ज्ञान वाढत जाईल त्याप्रमाणात त्यावर अधिक नियंत्रण ठेवता येईल. उदा., बाल गुन्हेगारीच्या संदर्भात सामाजिक संशोधन करुन अधिकाधिक ज्ञान प्राप्त केले असेल तर त्या ज्ञानाचा उपयोग करुन बाल गुन्हेगारीची समस्या नियंत्रीत करता येते.

**संदर्भ :**

१. Kerlinger F. N. (१९६४) Foundation of Behavioural Research Holt Rinchart and Winoton, Inc. New York १९६४.
२. Bailey Kenneth (१९६८) Method of Social Research, The Free press New York १९६८.
३. संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे (२०००) डॉ. प्रदिप आगलावे प्रमुख. डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा विभाग, नागपूर विद्यापीठ, नागपूर.
४. संशोधन पध्दती प्रक्रिया व अंतरंग (१९८८) डॉ. दु.का.संत पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन १७८६ सदाशिव पेठ, पुणे ४११०३०.